# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, मुंबई

# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## Unified District Information System for Education (U-DISE)

## जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली -शालेय माहिती संगणकीकरण प्रपत्र

### शैक्षणिक वर्ष : (2014-2015) संदर्भ दिनांक 30.09.2014 रोजीची माहिती

---

सर्व प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा माहितीचे दरवर्षी संगणकीकरण करावयाचे आहे.

माहिती प्रपत्राचे खालीलप्रमाणे A to R भाग आहेत.

[A] [I] शाळा तपशील.
[A] [II] शाळा तपशील (फक्त प्राथमिक स्तरासाठी).
[B] [I] शालेय इमारत / शैक्षणिक साधने / सुविधा / फर्निचर.
[B] [II] मध्यान्ह भोजन योजनेची माहिती. (फक्त शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळा)
[C] शिक्षकांची माहिती व अर्धवेळ निदेशकांची माहिती.
[D] इयत्ता पहिलीतील नवीन प्रवेश.
[E] चालू शैक्षणिक वर्षातील पट (संवर्गनिहाय).
[F] चालू शैक्षणिक सत्रातील पट (वयोगटानुसार).
[G] चालू शैक्षणिक सत्रातील पट (माध्यमनिहाय).
[H] चालू शैक्षणिक वर्षातील पुनर्प्रवेश.
[I] मुलांना मोफत पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबींचा तपशील. (मागील शैक्षणिक वर्षासाठी फक्त प्राथमिक वर्गासाठी) (इ. 1 ली ते 4 थी)
[J] मुलांना मोफत पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबींचा तपशील. (मागील शैक्षणिक वर्षासाठी फक्त उच्च प्राथमिक वर्गासाठी) (इ. 5 वी ते 7 वी )
[J] [I] मुलांना मोफत पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबींचा तपशील. (मागील शैक्षणिक वर्षासाठी फक्त उच्च प्राथमिक वर्गासाठी) (इ. 8 वी ते 10 वी )
[J] [II] मुलांना मोफत पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबींचा तपशील. (मागील शैक्षणिक वर्षासाठी फक्त उच्च प्राथमिक वर्गासाठी) (इ. 11 वी ते 12 वी )
[K] विशेष गरजा (CWSN) असलेली मुले / मुली.
[L] मागील शैक्षणिक वर्षात अपंग समावेशित शिक्षणांतर्गत पुरवठा केलेल्या साहित्याचा तपशील.
[M] शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या शाखा.
[N] उपलब्ध असलेल्या शाखांमधील विद्यार्थ्यांची संख्या आणि पुर्नप्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या.
[O] परिक्षांचे निकाल
[अ] मागील शैक्षणिक वर्षातील (सन २०१३-१४) इयत्ता १० वी च्या जात प्रवर्गनिहाय निकाल.
[ब] मागील शैक्षणिक वर्षातील (सन २०१३-१४) इयत्ता १० वी च्या जात निहाय टक्केवारीचा निकाल.
[क] मागील शैक्षणिक वर्षातील (सन २०१३-१४) इयत्ता १२ वी च्या जात प्रवर्गनिहाय निकाल.
[ड] मागील शैक्षणिक वर्षातील (सन २०१३-१४) इयत्ता १२ वी च्या जात निहाय टक्केवारीचा निकाल.
[P] पावती आणि खर्चाचा तपशील (रा.मा.शि.अ.)
[Q] शिक्षकेत्तर कर्मचारी/ प्रशासकिय व सहाय्यक कर्मचारी मंजूर व कार्यरत पदे.
[R] शाळेची अतिरिक्त माहिती.

**माहितीची व्याप्ती व मर्यादा :-**

Unified District Information System for Education (UDISE) सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रिय माध्यमिक शिक्षा अभियानअंतर्गत सर्व जिल्ह्यांसाठी संगणकीकृत माहिती देणारी प्रणाली आहे. या प्रणाली मधून प्राप्त माहितीचा उपयोग प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणविषयक वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक व अंमलबजावणी करण्याकरिता तसेच महत्वाचे निर्णय घेण्याकरिता होतो. ही माहिती अचूक व वस्तुनिष्ठ असणे आवश्यक आहे.

**जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, वरिष्ठ प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांकडून ही माहिती घेणे आवश्यक आहे. म्हणजेच यापैकी प्रत्येक शाळेचा पूर्ण फॉर्म भरून घेणे ही शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / म.न.पा. / न.पा. / न.प. / कटक मंडळ) यांची जबाबदारी असेल. सर्व माहितीचे समन्वय शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) जिल्हा परिषद हे करतील.**

शिक्षक, विद्यार्थी, वर्गखोल्या, शैक्षणिक साहित्य इत्यादीसंबंधी माहिती संपूर्ण शाळेसाठी एकत्रित लिहावी.

**माहिती भरण्यासाठी सर्वसामान्य सूचना :-**

1. प्रपत्रातील सर्व माहिती ही 30 सप्टेंबर, 2014 या संदर्भिय दिनांकानुसार भरण्यात यावी.
2. शाळा मुख्याध्यापकांनी प्रपत्राचे अगोदर काळजीपूर्वक वाचन करावे आणि अभिलेखाआधारे करावयाच्या नोंदी कच्च्या स्वरूपात स्वतंत्रपणे करून त्यानंतर केंद्र प्रमुखांना भरून द्याव्यात.
३. फॉर्मवर शाळेचा U-DISE कोड क्र. व शाळेचे नाव तपासून नंबर ठळकपणे लिहिला असल्याची खात्री करावी.
4. सर्व माहिती शाळेच्या मुख्याध्यापकांनीच लिहिणे व प्रमाणित करणे आवश्यक आहे.
5. प्रपत्र केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झाला नंतर मुख्यध्यापकांनी आठ दिवसाच्या आत प्रपत्र पुर्णपणे भरुन केंद्रप्रमुखांकडे सादर करावी.
6. मुख्याध्यापकांनी प्रपत्र केंद्रप्रमुखांना उपलब्ध करून चार दिवसानंतर अंतिम स्कूल रिपोर्ट कार्ड प्राप्त करून घ्यावे. त्या स्कूल रिपोर्ट कार्ड मध्ये बदल असल्यास बदल करून केंद्रप्रमुखांना बदलेली माहिती प्रणालीमध्ये बदल करण्याकरिता उपलब्ध करून दयावी व अंतिम स्कूल रिपोर्ट कार्ड प्राप्त करून दयावी.
7. अंतिम होवून प्राप्त झालेले स्कूल रिपोर्ट कार्ड मुख्याध्यापकांनी शाळेच्या दर्शनी भागामध्ये लावावे. ते स्कूल रिपोर्ट कार्ड SMC च्या सभेमध्ये चर्चा करावी.
8. शाळेचा देण्यात आलेला कोड नंबर इंग्रजी अंकात ठळकपणे भरावा.
9. प्रपत्रामध्ये जिथे कोड दिलेले आहे ते कोड इंग्रजी अंकात ठळकपणे लिहावे व जिथे माहिती अक्षरामध्ये विचारलेली आहे तिथे ती माहिती इग्रजी भाषेमधून कॅपिटल अक्षरामध्ये लिहावी.
10. सर्व विद्यार्थ्यांची माहिती जनरल रजिस्टर वरून घेण्यात यावी.
11. प्रपत्रातील तक्ता क्र. E, F, व G संख्या सारखी असावी.
12. शाळेतील सर्व शिक्षकांची मंजूर व कार्यरत पदे प्रपत्रामध्ये अचून नमूद करावी व प्रपत्रातील शिक्षकाची सर्व माहिती ही शिक्षकांची सर्व्हिस बुकांवरून घेण्यात यावी.
13. शक्यतो कोणतीही खाडाखोड करू नका. ज्या माहितीत दुरुस्ती करावयाची आहे तेथे लाल साईच्या पेनाने वतूळ करून अशी (X) खोडून बाजूला दुरुस्त नोंद करावी.
14. सूचनेचे तंतोतंत पालन करून योग्य जागी योग्य माहिती पर्यायाचा कोड नंबर लिहा.
15. सर्व मुद्द्यांची नोंद करणे व माहिती पूर्णपणे लिहिणे आवश्यक आहे.
16. गट शिक्षणाधिकारी यांनी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांचे कृतिसत्र आयोजित करून कृतिसत्रात -
    - फॉर्म भरण्यासंबंधीच्या सर्व सूचना समक्ष देऊन एक एक मुद्दा समजावून सांगावा. माहिती भरताना प्रत्येक मुद्द्याची संकल्पना पूर्णपणे स्पष्ट करावी.
    - फॉर्मवर शाळेचा कोड नंबर ठळकपणे लिहिला असल्याची खात्री करावी.
    - आपल्या विकास गटातील सर्व शाळांचे यादीनुसार फॉर्म भरून घेण्याची केंद्रप्रमुख / विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांची जबाबदारी आहे.
    - भरलेल्या फॉर्मचे प्रथम केंद्रनिहाय गठ्ठे करून त्यावर केंद्रनियंत्रण तक्ता लावावा.

## U-DISE 2014-15 (CLUSTER CONTROL SHEET )

जिल्हा :-------------------------------- गट : ---------------------------

केंद्रशाळा: -------------------------------- एकूण शाळा: ----------------------------

तपासले.

**सही**
**(केंद्रप्रमुख)**
**शिक्का**

**सही**
**(विस्तार अधिकारी)**
**शिक्का**

गटाचे सर्व फॉर्मस् केंद्रनिहाय एकत्र बांधून त्यावर **BLOCK CONTROL SHEET** लावावे. ज्या शाळांचे फॉर्मस् या गठ्ठ्यात असतील त्यांच्या क्रमांकाभोवती वर्तुळ करून एकूण फॉर्मस्ची संख्या लिहा.

U-DISE 2014-15 (BLOCK CONTROL SHEET)

जिल्हा : --------------------------------
गट : --------------------------------

एकूण शाळा : ---------------------------

**गटशिक्षणाधिकारी**

**उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)**

# जिल्हा शैक्षणिक माहिती पद्धती
## सूचना पुस्तिका
## शालेय माहिती संगणकीकरण प्रपत्र

### सामान्य सूचना...

1. सर्व शाळांची माहिती संकलित करण्यात यावी. ही माहिती जि.प./ आदिवासी / समाजकल्याण / शासकीय / शासनमान्य खाजगी अनुदानित व विना अनुदानित शाळा / केंद्रीय विद्यालय/हवाई दलाच्या शाळांची गोळा करण्यात यावी. SSC / ICSE / CBSE/ सर्व प्रकारचे अभ्यासक्रम अवलंब करणाऱ्या शाळांचा समावेश करावा.
2. शाळा संकलन प्रपत्रात ही माहिती शाळेतील जनरल रजिस्टर आणि अभिलेखे यावर आधारित असावी. ती मुख्याध्यापक /प्र.मुख्याध्यापक यानी अचूक भरावी.
3. प्रत्येक वर्षाच्या माहितीसाठी 30 सप्टेंबर ही तारीख आधारभूत धरावी. आर्थिक तरतुदींची माहिती प्रत्येक वर्षी 1 एप्रिल ते 31 मार्च ह्या कालावधीची असावी.
4. प्रपत्रातील माहिती भरताना अंक इंग्रजीत व तपशील इंग्रजीमधून लिहावेत.
5. प्रपत्रामध्ये विचारलेली माहिती तसेच दिलेल्या पर्यायांपैकी द्यावयाचे उत्तर हे दिलेले अनुक्रमांकच प्रपत्रात नमुद करावे. त्यामध्ये कोणताही बदल करु नये.
6. प्रपत्र हे अचूक व सुवाच्य असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा अक्षरावर पुनर्लेखन करू नये. नोंदीत चूक झाल्यास ती नोंद खोडून पुन्हा बाजूला सुधारित नोंद लिहावी व स्वाक्षरी करावी.
7. जेथे पर्याय उपलब्ध आहेत तेथेच अचूक संकेतांकाचा वापर करावा. सांकेतिक क्रमांक अत्यंत काळजीपूर्वक लिहावेत.
8. संकलन पत्रातील सर्व बाबींची माहिती पूर्णपणे भरावी. कोणताही रकाना रिकामा किंवा अर्धवट ठेवू नये.
9. एका इमारतीत एकापेक्षा अधिक शाळा कार्यरत असल्यास सर्व शाळांची माहिती स्वतंत्रपणे वेगळ्या प्रपत्रात भरून द्यावी. जर शाळा दुबार पद्धतीने भरत असेल व शाळेचे मुख्याध्यापक एकच असतील तर एकाच प्रपत्रात माहिती भरावी. (एक प्रमुख एक शाळा)
10. मुख्याध्यापक यांनी संकलित प्रपत्रातील माहिती काळजीपूर्वक पडताळून पाहावी व अचूक असल्याची खात्री झाल्यावर संकलित प्रपत्राच्या शेवटी स्वतःची स्वाक्षरी करावी व प्रपत्र पाठविण्यात यावे.
11. संकलित प्रपत्र जिल्हास्तरावर सादर करण्यापूर्वी संबंधित केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी यांनी प्रपत्रांची पडताळणी करून योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.
12. केंद्रप्रमुख, १००%शिक्षण विस्तार अधिकारी (५०%) व गटशिक्षण अधिकारी (१०%) यांनी प्रपत्रांची काळजीपूर्वक तपासणी करावी व निदर्शनास आलेल्या चुकांची योग्य त्या रीतीने दुरुस्ती करावी. प्रपत्रांची तपासणी केल्यानंतरच गटस्तरावरील डाटा एंट्री ऑपरेटर यांचेकडे प्रपत्रे वर्ग करावीत.
13. विस्तार अधिकारी यांनी 50 टक्के प्रपत्राची शाळापातळीवर तपासणी केल्यानंतर त्या आधारे स्वतंत्र तपासणी अहवाल गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर करावा.
14. गटशिक्षणाधिकारी यांनी पडताळणी करताना सर्व नोंदी अचूक भरल्या आहेत, याची खात्री करावी. कोणताही रकाना रिकामा नाही, (प्राधान्याने माध्य शाळा तपासणे) हे तपासावे. 10% तपासणी अहवाल शिक्षणधिकारी (प्राथमिक /माध्यमिक) यांचेकडे सादर करावा.
15. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांच्याकडे सादर करावा.
16. शाळेचा DISE CODE क्रमांकात बदल करू नये. नविन शाळेस शेवटच्या क्रमांकापुढील क्रमांक देण्यात यावा.
17. उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक /निरंतर ) यांना प्रत्येक तालुक्यातील शाळांच्या 2% शाळांच्या UDISE फॉर्मची पडताळणी करणे.
18. शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक/ निरंतर डायट प्राध्यापक) यांनी प्रत्येक तालुक्यातील शाळांना 1% शाळांची पडताळणी करणे.

### A.[I] शाळा तपशील

**शाळा संकेतांक (U-DISE)** : शाळा संकेतांक क्र. हा 11 अंकामध्ये नमूद करण्यात यावा.

1. **शाळेचे नाव** : शाळेचे पूर्ण नाव व गावाचे नाव अभिलेखाप्रमाणे लिहावे.
2. **ग्रामीण / शहरी** : ग्रामीण भागासाठी 1 आणि शहरी भागासाठी 2 हा संकेतांक वापरावा.
3. **वस्तीचे नाव** : ग्रामीण भागात शाळा ज्या वस्तीत आहे त्या वस्तीचे नाव लिहावे / गल्ली मोहल्ला (शहरी भागाकरिता)
4. **गावाचे नाव / वॉर्ड नाव** : ग्रामीण भागातील शाळांनी गावाचे नाव लिहावे / शहरी भागातील शाळांनी वॉर्ड नाव लिहावे.
5. **पिनकोड** : पिनकोड पोस्टखात्याप्रमाणे लिहिणे अनिवार्य आहे. (गाव/वॉर्ड ज्या ठिकाणी शाळा कार्यरत आहेत ते ठिकाण.)
6. **ग्रामपंचायतीचे नाव** : ग्रामीण भागातील शाळांनी ग्रामपंचायतीचे नाव लिहावे.
7. **केंद्र शाळेचे नाव** : ग्रामीण भागात ज्या केंद्राअंतर्गत शाळा कार्यरत आहे त्या केंद्राचे (CRC) पूर्ण नाव - शहरी भागात ज्या केंद्राअतर्गत शाळा आहे तेथे नोडल URC चे नाव लिहावे.
8. **महसूली तालुक्याचे नाव** : शाळा ज्या महसूली विभागात कार्यरत असेल त्या महसूली तालुक्याचे नाव लिहावे.
9. **शैक्षणिक तालुक्याचे नाव** : ग्रामीण भागासाठी गटाचे नाव, महानगरपालिकेसाठी महानगरपालिकेचे नाव.
10. **विधानसभा मतदार संघ क्रमांक व नाव** : शाळा ज्या विधानसभा मतदार संघात आहे त्या मतदार संघाचा क्रमांक व नाव लिहावे.
11. **महानगरपालिका / नगरपरिषदेचे नाव** : शाळा ज्या नगरपालिकेच्या क्षेत्रात येते त्या नगरपरिषदेचे/पालिकाचे नाव लिहावे, ग्रामीण भागातील शाळांनी येथे निरंक लिहावे.
12. **शहराचे नाव** : शाळा ज्या शहरात आहे त्या शहराचे नाव नमूद करावे. ग्रामीण भागातील शाळांना लागू नाही. (अ, ब, क वर्ग मनपा / नगरपालिका क्षेत्रासाठी)
13. **दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :-**
    - (i) शाळेचा दूरध्वनी /मुख्याध्यापकाचा /उपमुख्याध्यापकाचा/मुख्याध्यापक नसल्यास जी व्यक्ती मुख्याध्यापकाचे काम पाहते त्या व्यक्तीचा भ्रमणध्वनी क्रमांक येथे नमूद करावा.
    - (ii) प्रपत्र भरणाऱ्या कर्मचाऱ्याचा शाळेच्या लँडलाईन नंबर STD कोडसह व वैयक्तिक भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा.
    - (iii) शाळेचा ई-मेल असल्यास तो नमुद करावा तसेच शाळेचे संकेतस्थळ असल्यास ते नमुद करावे.

**14. शाळेचा प्रवर्ग :** - योग्य पर्याय निवडावा - शाळेतील सर्वांत लहान व सर्वांत मोठ्या वर्गानुसार शाळेची वर्गवारी करावी.

1. **प्राथमिक शाळा (01):** इयत्ता 1 ते 4/5 वर्ग असलेल्या शाळांची नोंद प्राथमिक शाळा म्हणून करावी.
2. **प्राथमिक व उच्च प्राथमिक एकत्र (02):** इयत्ता 1 ते 7/8वी वर्ग असलेली शाळा.
3. **प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक एकत्र (03):** शाळेमध्ये 1 ते 11/12 वी पर्यंत वर्ग असलेली शाळा.
4. **फक्त उच्च प्राथमिक (04):** शाळेमध्ये फक्त 5वी/6वी/7वी/8 वी असलेली शाळा. अशा शाळेस 8/9/10वी 11आणि 12वीचा वर्ग असणार नाही.
5. **उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक एकत्र (05):** 5वी ते 11/12वी चे वर्ग असलेली शाळा.
6. **प्राथमिक, उच्चप्राथमिक व माध्यमिक (06):** 1ली ते 10 वी चे वर्ग असलेली शाळा.
7. **उच्चप्राथमिक व माध्यमिक एकत्र (07) :** इयत्ता 5वी ते 10 वी चे वर्ग असलेली शाळा.
8. **फक्त माध्यमिक (08):** इयत्ता 8वी ते 10 वी चे वर्ग असलेली शाळा.
9. **माध्यमिक व उच्च माध्यमिक (10):** 8वी ते 12वी चे वर्ग असलेली शाळा.
10. **स्वतंत्र उच्चमाध्यमिक/उच्चमाध्यमिक व महाविद्यालय एकत्र (11) :** 11 वी 12/12पासून पुढे चे वर्ग असलेल्या शाळा.

**15. शाळेतील सर्वात खालचा वर्ग :** शाळेतील सर्वांत खालच्या वर्गात प्रवेशपात्र विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो तो खालचा वर्ग / (अंगणवाडी, बालवाडी, पूर्व प्राथमिक शिक्षण केंद्र यांचा यात समावेश नाही.) शाळेतील सर्वांत खालची इयत्ता 1ली, 5वी किंवा 8वी व 11 वी.

**16. शाळेतील सर्वांत वरचा वर्ग:** शाळेतील सर्वांत वरचा वर्ग दर्शविला जावा.

**17. शाळेचा प्रकार :** पुढीलपैकी योग्य पर्याय निवडा (प्राथकिम, माध्यमिक व उच्च-माध्यमिक स्वतंत्र पणे नमुद करावे)

1. फक्त मुलांची शाळा (जेथे मुलींना प्रवेश नाही.)
2. फक्त मुलींची शाळा (जेथे मुलांना प्रवेश नाही.)
3. सहशिक्षण (जेथे मुली व मुलांना प्रवेश दिला जातो.)

**18. व्यवस्थापन प्रकार:** खालील योग्य पर्याय निवडावा. शालेय व्यवस्थापनासाठी खालील संकेतांक दिले आहेत. शाळेय प्रशासनामध्ये कर्माचाऱ्याच्या नियुक्त्या ज्या यंत्रणेमार्फत केल्या जातात त्यावरुन व्यवस्थापनाचा प्रकार निश्चित केला जाते.

1. **शिक्षण विभाग :** राज्यशासनाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शाळा, शिक्षण विभागात 1 हा संकेतांक नमूद करावा.
2. **खाजगी अनुदानित :** शासनमान्य खाजगी संस्थांनी चालविलेली व शासनाकडून अनुदान घेणारी शाळा / अनुदानित स्वरूपाच्या शाळांसाठी 4 हा संकेतांक नमूद करावा.
3. **इतर शाळा:** नमूद केलेल्या शाळेच्या व्यतिरिक्त इतर शाळांसाठी 6 हा संकेतांक नमूद करावा.
4. **मान्यता प्राप्त नसलेल्या :** मान्यता प्राप्त नसलेल्या अनाधिकृत शाळांसाठी 8 हा संकेतांक नमूद करावा.
5. **समाजकल्याण :** समाजकल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी 10 हा संकेतांक नमूद करावा.
6. **समाजकल्याण खाजगी अनुदानित :** समाजकल्याण विभागाची मान्यता असलेल्या परंतु खाजगी संस्थेद्वारे अनुदानावर चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी 11 हा संकेतांक नमूद करावा.
7. **समाजकल्याण खाजगी विनाअनुदानित :** समाजकल्याण विभागाची मान्यता असलेल्या परंतु खाजगी संस्थेद्वारे विनाअनुदानावर चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी 12 हा संकेतांक नमूद करावा.
8. **आदिवासी विकास :** आदिवासी कल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी (आश्रमशाळा) 13 हा संकेतांक नमूद करावा.
9. **आदिवासी विकास खाजगी अनुदानित :** आदिवासी कल्याण विभागाची मान्यता असलेल्या परंतु खाजगी संस्थेद्वारे अनुदानावर चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी (आश्रमशाळा) 14 हा संकेतांक नमूद करावा.
10. **आदिवासी विकास खाजगी विनाअनुदानित :** आदिवासी कल्याण विभागाची मान्यता असलेल्या परंतु खाजगी संस्थेद्वारे विनाअनुदानावर चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी (आश्रमशाळा) 15 हा संकेतांक नमूद करावा.
11. **जिल्हा परिषद :** जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या शाळांसाठी 16 हा संकेतांक नमूद करावा.
12. **महानगरपालिका :** महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या शाळांसाठी 17 हा संकेतांक नमूद करावा.
13. **नगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत:** नगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या शाळांसाठी 18 हा संकेतांक नमूद करावा.
14. खाजगी **विनाअनुदानित :** शासनमान्य खाजगी व्यवस्थापनाच्या अधिनस्त असलेली व शासनाकडून अनुदान मिळत नसलेली / विनाअनुदानित शाळांसाठी 19 हा संकेतांक नमूद करावा.
15. **खाजगी कायम विनाअनुदानित :** शासनमान्य खाजगी व्यवस्थापनाच्या अधिनस्त असलेली व शासनाकडून कायम अनुदान मिळत नसलेली / कायम विनाअनुदानित शाळांसाठी 20 हा संकेतांक नमूद करावा.
16. **शास. सैनिकी शाळा :** राज्य व केंद्रशासनाच्या अधिनस्त असलेली सैनिकी शाळांसाठी 21 हा संकेतांक नमूद करावा.(सैनिक शिक्षण देणा-या शाळा)
17. **केंद्रीय विद्यालय :** केंद्रशासनाच्या अधिनस्त असलेले केंद्रीय विद्यालयासाठी 22 हा संकेतांक नमूद करावा.
18. **नवोदय विद्यालय :** केंद्रशासनाच्या अधिनस्त असलेले नवोदय विद्यालयासाठी 23 हा संकेतांक नमूद करावा.
19. **रेल्वे शाळा :** केंद्रशासनाच्या अधिनस्त असलेल्या रेल्वेच्या शाळांसाठी 24 हा संकेतांक नमूद करावा. (टप्पा अनुदान)
20. **खाजगी अंशत : अनुदानित** : खाजगी शाळेला शासनाकडून काही प्रमाणामध्ये अनुदान मिळत असल्यास 25 हा संकेतांक नमुद करावा.
21. **वेदीक/संस्कृत/धार्मिक शिक्षण देणा-या संस्था :** शाळेची संस्था वेदिक /संस्कृत/धार्मिक शिक्षण देणारी असल्यास 26 हा संकेतांक नमूद करावा.
22. **स्वयं अर्थ सहाय्यता शाळा:** शाळा ही स्वयं अर्थ सहाय्यता शाळा असल्यास 27 हा संकेतांकनमूद करावा.
23. खाजगी सैनिक शाळा करीता 28 हा सांकेतांक नमुद करावा.
24. **कटकमंडळ :** कन्टोमेन्ट बोर्ड (भारतीय लष्कराची छावणी) च्या अधिनस्त असलेल शाळासाठी 29 हा सांकेतांक नमुद करा.
25. **मान्यता प्राप्त मदरसा:** मान्यता प्राप्त मदरसांसाठी 97 हा संकेतांक नमूद करावा.
26. **मान्यता नसलेल्या मदरसा:** मान्यता नसलेल्या मदरसा साठी 98 हा संकेतांक नमूद करावा.

**19. शाळेचे अंतर कि.मी.:- नजीकच्या शासकीय / शासन अनुदानित शाळेपर्यंत (फक्त प्राथमिक 1-7/8)**

अ. **प्राथमिक शाळेपासून ते नजीकच्या उच्च प्राथमिक शासकीय / शासन अनुदानित शाळेपर्यंत अंतर :** दशांशाचा वापर करू नये. फक्त पूर्णांक लिहावेत. (उदा. एक कि.मी. असल्यास 001 असे नमूद करावे, दहा कि.मी. अंतर असलयास 010 लिहावे.)

ब. **उच्च प्राथमिक शाळेपासून ते नजीकच्या माध्यमिक शासकीय / शासन अनुदानित शाळेपर्यंत अंतर :** महानगरपालिकेसाठी वॉर्डापासून अंतर विचारात घ्यावे. (उदा.एक कि.मी. असल्यास 01असे नमूद करावे)

**20. सर्व ऋतूमध्ये शाळेपर्यंत पोहचण्यास व्यवस्था आहे काय ? :** सर्व ऋतूमध्ये शाळेपर्यंत पाहेचण्यास रस्ता असल्यास-1, नसल्यास-2 लिहावे.

**21. शाळा स्थापनेचे वर्ष:** शाळा स्थापनेचे वर्ष लिहावे. स्थापनेचे वर्ष अभिलेखाधारे पडताळून पाहावे. (उदा. 1990, 2001, 2010 अश्याच प्रकारे नमूद करावे)

**22. शाळेस शासनाची मान्यता मिळाल्याचे वर्ष :** खाजगी मान्यता प्राप्त शाळांनी ज्या वर्षी शाळेला शिक्षण समिती /शिक्षण मंडळ/शिक्षण उपसंचालक यांचेकडून मान्यता मिळाली असेल ते वर्ष नमुद करावे. (उदा. 1990, 2001, 2010 अश्याच प्रकारे नमूद करावे)

**23. शाळेचे उच्चीकरण झाले असल्यास वर्ष ? :** शाळा प्राथमिक शाळेतून उच्च प्राथमिक / उच्च प्राथमिक शाळेतून माध्यमिक / माध्यमिक शाळेतून उच्च माध्यमिक शाळेत उच्चीकरण झालेली असल्यास वर्ष नमूद करावे.

**24. विशेष गरजा असणा-या (CWSN) विदयार्थ्यांसाठी विशेष शाळा :** अपंग (CWSN) विद्यार्थ्यांसाठी विशेष शाळा मान्यता असल्यास व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांची मान्यता असल्यास 1, नसल्यास 2 प्रपत्रात नमुद करावे.

**25. दोन सत्रातील शाळा :** शाळेच्या इमारतीत शाळेचे काही वर्ग एका सत्रात आणि उर्वरित वर्ग दुसऱ्या सत्रात भरत असल्यास अशी शाळा - दोन सत्रातील (सकाळ / दुपार) शाळा. शाळा इमारतीचा उपयोग दुबार पध्दतीसाठी केला जात असल्यास 'होय' साठी 1 व 'नाही' साठी 2 अंकाचा वापर करावा.

**26. शाळा निवासी आहे काय? :** शाळेला जोडून वसतिगृहाची सोय असलेल्या (तिथे मुलांची / मुलींची निवासाची, भोजनाची सोय आहे.) अशी शाळा. असल्यास-1, नसल्यास-2 प्रपत्रात लिहावे. (प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च-माध्यमिक मध्ये शाळा निवासी असल्यास प्रकार स्वतंत्र पणे नमूद करावे)

**होय असल्यास शाळा निवासी प्रकार आश्रमशाळा (शासकिय) असल्यास - 1 नमूद करावे व आश्रमशाळा नसलेल्या (शासकिय) असल्यास - 2 नमूद करावे. खाजगीसाठी - 3, इतर साठी - 4, KGBV साठी - 6 व Model School साठी - 7 अंक दर्शवावे.**

**27. शाळा धार्मिक अल्पसंख्याक आहे का ? होय साठी - 1, नाही साठी - 2. जर होय असल्यास अल्पसंख्याकाचा प्रकार (मुस्मिल = 1, शिख = 2, जैन = 3, ख्रिचन = 4, पारशी = 5, नव बौध = 6, इतर = 7 )**

**28. शाळेचे माध्यम :**

शिक्षणाचे माध्यम दोन अंकी संकेतांकात लिहावेत. जर शाळेमध्ये एकापेक्षा जास्त भाषा शिक्षणाचे माध्यम वापरले जात असल्यास अ, ब, क, ड पर्याय वापरावेत. भाषेसाठी खालील संकेतांक वापरावेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बंगाली (02) | गुजराती (03) | हिंदी (04) | कन्नड (05) | मराठी (10) | संस्कृत (14) |
| सिंधी (15) | तामिळ (16) | तेलुगू (17) | उर्दू (18) | इंग्रजी (19) | |

**29. मंडळ संलग्नता :** शाळेत शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाचा प्रकार खालील पैकी प्रकाराचा संकेतांक माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांसाठी वेगवेगळा नमूद करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | **C.B.S.E.** | : | Central Board of Secondary Education केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड. |
| 2. | **S.S.C.** | : | Secondary School Certificate (Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. |
| 3. | **I.C.S.E.** | : | Indian Certificate of Secondary Education. |
| 4. | **I.B.** | : | International Baccalaureate. |
| 5. | **Other** | : | इतर. |
| 6. | **IGCSE** | : | **Internationl General Certificate of Secondary Education.** |
| 7. | **State & other** | : | **State & other Board like CBSC, ICSE, IB, IGCSE,other** |

**अ) शाळांमध्ये माध्यमिक स्तरावरती पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम घेतला जात असल्यास प्रपत्रामध्ये - 1 नमूद नसल्यास - 2 नमूद करावे.**

**ब) शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यवसायक मार्गदर्शनबाबत सल्ला दिला जात असल्यास प्रपत्रामध्ये - 1 नमूद नसल्यास - 2 नमूद करावे.**

**30. शाळेची भौगोलिक माहिती :** शाळेची भौगोलिक माहिती उपलब्ध असल्यास संगणकीय प्रपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे अक्षांश-रेखांश लिहावे.

**31. शाळेला पूर्व प्राथमिक विभाग जोडला आहे काय? (अंगणवाडी सोडून)** = शाळेला जोडून बालवाडी /Junior K.G. /Sr.KG सुरू असल्यास-1, नसल्यास-2 प्रपत्रात नमूद करावे. होय असल्यास, विद्यार्थी संख्या व शिक्षक संख्या लिहावी.

**32. शाळेच्या परिसरात / जोडून अंगणवाडी आहे काय? :** ICDS विभागामार्फत सुरू असल्यास होय लिहावे अन्यथा नाही लिहावे. होय असल्यास, विद्यार्थी संख्या व ताईंची / दाईंची संख्या लिहावी. जर शाळेच्या परीसरात/जवळ/लगत अंगणवाडी असल्यास होय नमूद करावे.

**33. मागील शैक्षणिक वर्षाचा तपशील (2013-14) :** शाळा भेटी व तपासणी संख्या शाळेच्या शेरे बुक मधील नोंदींनुसार करणे.

अ. **एकूण शैक्षणिक तपासणीची संख्या :** मागील शैक्षणिक वर्षात झालेल्या शैक्षणिक तपासणीची संख्या.

ब. **केंद्र प्रमुखांच्या भेटींची संख्या :** मागील शैक्षणिक वर्षात केंद्रप्रमुखांनी यांनी किती भेटी दिल्या ते दर्शवावे. मुंबईसाठी विभाग निरीक्षक / सहा शिक्षण उप.निरीक्षक यांच्या भेटींची संख्या.

क. **गटस्तरावरील अधिकाऱ्यांच्या भेटींची संख्या :** मागील शैक्षणिक वर्षात गटस्तरावरील (विस्तार अधिकारी / गटशिक्षणाधिकारी) अधिकाऱ्यांच्या किती भेटी दिल्या ते दर्शवावे. मुंबईसाठी अधीक्षक / शिक्षण उप निरीक्षक यांच्या भेटींची संख्या.

**34. शालेय निधी (मागील आर्थिक वर्ष 2013-14) MDM सोडुन (फक्त प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गासाठी)** शाळेच्या बॅक खात्याच्या तपशिलानुसार देणे.

अ. **शाळा अनुदान (सशिअ अंतर्गत) :** शाळेला मिळालेल्या (रु. 5000 व रु.7000 प्रतिवर्षी) शाळा अनुदान मिळालेला निधीचा व खर्च झालेल्या निधीचा उल्लेख करावा. शिक्षकांच्या अनुदानाचा रुपये 500 चा उल्लेख येथे करू नये.

ब. **शाळा देखभाल दुरुस्ती अनुदान (सशिअ अंतर्गत) :** शाळेला मिळालेल्या देखभाल दुरुस्ती अनुदान निधीचा व खर्च झालेल्या निधीचा उल्लेख करावा.

क. **शिक्षक अनुदान (सशिअ अंतर्गत):** शिक्षकांना शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी देय असलेल्या रु. 500 अनुदानाअंतर्गत प्रत्येकास प्राप्त झालेली रक्कम. हे अनुदान शाळेतील शिक्षकांच्या संख्येनुसार असेल.

**35. कर्मचारी संवर्ग : ( शाळेतील सर्व कर्मचारी )** खाजगी शाळा संच मान्यता आदेशानुसार नोंदी करणे. संदर्भ दिनांक 30 सप्टेंबर, 2014 नुसार

* **(जिल्हा परिषदेतील शाळांसाठी गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षक मंजूर पदांची संख्या शाळेला द्यावी.)**

**अ.** **शिक्षक (मुख्याध्यापक व शिक्षण सेवकासह) :** नियमित वेतनश्रेणीत असणारे शिक्षक (शिक्षण सेवक/प्राचार्य / मुख्याध्यापकांसह) मान्य पदांची संख्या ही अभिलेखाप्रमाणे प्रपत्रामध्ये मंजूर पदे येथे नमुद करावी. शारीरिक शिक्षक, संगीत शिक्षक यांचाही समावेश शिक्षक म्हणून करावा. एकूण मंजूर पदांपैकी व कार्यरत असणारी पदे (प्राथमिक / उच्च प्राथमिक/माध्यमिक स्तर व उच्च-माध्यमिक स्तर) प्रपत्रामध्ये भिन्न-भिन्न नमुद करावी.

**ब.** **शिक्षक / निमशिक्षक (करार तत्वावर):** एकूण कार्यरत निमशिक्षक असणाऱ्या शिक्षकांची संख्या (प्राथमिक स्तर, उच्च प्राथमिक स्तर माध्यमिक स्तर व उच्च-माध्यमिक स्तर स्वतंत्र पणे नमुद करावे .

**क.** **अंशकालीन निदेशक RTE Act 2009 नुसार :** शाळेमधील फक्त उच्च प्राथमिक वर्गांसाठी कार्यरत असलेल्या अर्ध वेळ RTE Act 2009 नुसार शिक्षकांची संख्या लिहावी.

## A (II) शाळा तपशील (फक्त प्राथमिक स्तरासाठी)

**1. शाळेचे प्रत्यक्ष कामाचे दिवस व शैक्षणिक तास :**

**अ)** शाळेचे मागील शैक्षणिक वर्षातील प्रत्यक्ष कामाचे दिवस प्राथमिक व उच्च प्राथमिक प्रपत्रामध्ये भिन्न-भिन्न नमुद करावे.

**ब)** चालू शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांची शाळेमध्ये उपस्थितीचे सरासरी प्रति दिनाचे तास प्राथमिक व उच्च प्राथमिक प्रपत्रामध्ये भिन्न-भिन्न नमुद करावे.

**क)** चालू शैक्षणिक वर्षातील शिक्षकांच्या कामाचे शाळेमध्ये सरासरी प्रति दिनाचे तास प्राथमिक व उच्च प्राथमिक प्रपत्रामध्ये भिन्न-भिन्न नमुद करावे.

**2. सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन शाळेत राबविले जाते का? :** सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन शाळेत राबविले जात असल्यास-1, नसल्यास-2 अन्यथा लागू नाही-0 असे प्रपत्रात नमूद करावे.

**होय असल्यास -**

**अ)** प्रत्येक विद्यार्थ्याचे नियमित अभिलेख ठेवले असल्यास-1, नसल्यास-2, अन्यथा लागू नाही-0 असे लिहावे.

**ब)** सदरील अभिलेख पालकांच्या निदर्शनास आणित असल्यास-1, नसल्यास-2, अन्यथा लागू नाही-0 असे लिहावे.

**3. (3.1) फक्त खाजगी विनाअनुदानित शाळांसाठी (चालू शैक्षणिक वर्षासाठी) :** प्रवेश कार्य पद्धतीचा वापर करुन नोंदवही नुसार माहीती देणे

**अ)** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील 25% आरक्षणांतर्गत चालू शैक्षणिक वर्षात पुर्व प्राथमिक / पहिलीतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या प्रपत्रामध्ये नमुद करावी.

**ब)** 25% आरक्षणांतर्गत मागील शैक्षणिक वर्षात प्रवेश दिलेल्यापैकी चालु शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या प्रपत्रामध्ये नमुद करावी.

**(3.2) फक्त शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / अनुदानित शाळांसाठी :** शाळेत शाळा व्यवस्थापन समिती (SMC) स्थापन केली असल्यास-1, नसल्यास-2, अन्यथा लागू नाही-0 असे प्रपत्रामध्ये नमूद करावे.

**होय असल्यास,**

**अ)** शाळा व्यवस्थापन समिती एकूण सदस्य संख्या पुरुष व महिला प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न नमूद करावी.

**ब)** समिती मधील एकूण सदस्यांपैकी पालक सदस्य संख्या प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न नमूद करावी.

**क)** समितीमधील एकूण सदस्यांपैकी स्थानिक प्राधिकरणाने नामनिर्देशित सदस्य संख्या प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न नमूद करावी.

**ड)** मागील शैक्षणिक वर्षातील शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकांची संख्या प्रपत्रामध्ये नमूद करावी. (इतिवृत नोंद वहीमधील नोंदनुसार)

**इ)** समितीने शाळा विकास आराखडा तयार केला असल्यास-1, नसल्यास-2, अन्यथा लागू नाही-0 असे प्रपत्रामध्ये नमूद करावे.

**फ)** समितीचे (SMC) स्वतंत्र बँक खाते ठेवले गेले असल्यास-1, नसल्यास-2, अन्यथा लागू नाही-0 असे प्रपत्रामध्ये नमूद करावे. होय असल्यास, बँकेचे नाव, शाखेचे नाव, खाते क्रमांक, खाते नाव, IFSC Code क्रमांक प्रपत्रात नमूद करावा.

**4. विशेष प्रशिक्षणाचा तपशील (शाळाबाह्य मुलांसाठी) : वयानुरुप प्रवेश दिल्याबाबत.**

**अ)** चालू शैक्षणिक सत्रात विशेष प्रशिक्षण दिलेल्या (30 सप्टेंबरपर्यंत) विद्यार्थ्यांची संख्या मुले व मुली प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न नमूद करावी.

**ब)** मागील शैक्षणिक सत्रात विशेष प्रशिक्षणाची गरज असलेल्या, प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मुले व मुली प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न नमूद करावी.

**क)** मागील शैक्षणिक सत्रात विशेष प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मुले व मुली प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न नमूद करावी.

**ड)** विशेष प्रशिक्षण ज्यांच्या मार्फत दिले जात आहे. त्याचा दिलेल्या सांकेतांकापैकी योग्य सांकेतांक प्रपत्रामध्ये नमूद करावा.

**इ)** विशेष प्रशिक्षण ज्या ठिकाणी दिले जात आहे. त्या ठिकाणाबाबतचा योग्य सांकेतांक प्रपत्रामध्ये नमूद करावा.

**ई)** विशेष प्रशिक्षणाच्या प्रकाराबाबतचा योग्य सांकेतांक प्रपत्रामध्ये नमूद करावा.

**5. शैक्षणिक सत्राची सुरुवात केव्हा झाली (महिना अंकात लिहावा) :** चालू शैक्षणिक वर्षात शाळेची शैक्षणिक सत्राची सुरुवात झालेला महिना अंकामध्ये नमूद करावा.

**6. चालू शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तके मिळाली आहेत काय (30 सप्टेंबर 2014 पर्यंत) ?**

चालू शैक्षणिक वर्षात पाठयपुस्तके 30 सप्टेंबरपर्यंत मिळाली असल्यास होय असल्यास 1 लिहावे अन्यथा नाहीसाठी 2 लिहावे.

**होय असल्यास,**

**अ)** चालू शैक्षणिक वर्षात पुस्तके ज्या दिवशी उपलब्ध झालेली असतील त्या दिवसाचा महिना व वर्ष प्रपत्रात अंकात नमूद करावा.

**7. चालू शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तके / अध्ययन अध्यापन साहित्य आणि खेळ साहित्य उपलब्धता (स्तर निहाय)**

शाळेमधील चालू शैक्षणिक वर्षात पाठयपुस्तके / अध्ययन अध्यापन साहित्य आणि खेळ साहित्य उपलब्ध असलेल्याबाबतची माहिती प्रपत्रामध्ये विचारल्याप्रमाणे भरावयाची आहे. पाठयपुस्तकांचे संपूर्ण संच, प्रत्येक वर्गासाठी अध्ययन-अध्यापन साहित्याची उपलब्धता, प्रत्येक वर्गासाठी खेळाचे साहित्याची उपलब्धता शाळेच्या स्तरनिहाय उपलब्ध असल्यास 1 लिहावे, नसल्यास 2, अन्यथा लागू नाहीसाठी 0 प्रपत्रामध्ये नमूद करावे.

**8. क्रमांक 8 मधिल माहिती फक्त माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी लागू आहे.**

8 (अ) शाळेचे मागील शैक्षणिक वर्षांतील प्रत्यक्ष अध्यापनाचे दिवस माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न नमुद करावे. (विद्यार्थी हजेरीनुसार)

8 (ब) सातत्यपुर्ण व सर्वंकष मूल्यमापन शाळेत राबविले जाते का ? : सातत्यपुर्ण व सर्वकष मुल्यमापन शाळेत राबविले जातअसल्यास -1, नसल्यास 2, अन्यथा लागू नाही-0 असे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रपत्रामध्ये भिन्न भिन्न करावे.

8 (क) शाळा व्यवस्थापन समिती व शाळा व्यवस्थापन आणि विकास समिती (SMC & SMDC) एकच असल्यास 1 व नसल्यास 2 लिहावे.

- (अ) शाळा व्यवस्थापन समिती व शाळा व्यवस्थापन आणि विकास समिती स्थापन असल्यास त्याबाबतचा तपशिल सदर त्या खाली दिलेल्या अ.क्र. 1 ते 12 रकान्यात भरावा.
- (ब) मागील शैक्षणिक सत्रामध्ये SMDC च्या झालेल्या बैठकांची संख्या लिहावी.
- (क) SMDC ने शाळा सुधार आराखडा (School Improvement plan) तयार केला असल्यास-1, नसल्यास-2 अन्यथा लागू नाही-3 नमूद करावे.
- (ड) SMDC चे स्वतंत्र बँक खाते ठेवले गेले असल्यास -1, नसल्यास -2, अन्यथा लागू नाही-3 असे प्रपत्रामध्ये नमुद करावे. होय असल्यास, बँकेचे नाव, शाखेचे नाव, खाते क्रमांक, बँक खाते क्रमांक, IFSC Code क्रमांक प्रपत्रात नमुद करावा.
- (इ) शाळा बांधकाम समिती (School bulding committee (SBC) गठीत करण्यत आली असल्यास -1, नसल्यास -2, असे प्रपत्रामध्ये नमूद करावे.
- (ई) शाळेने शैक्षणिक समिती (AC) स्थापन असल्यास -1, नसल्यास -2, असे प्रपत्रामध्ये नमूद करावे.
- (प) शाळेने पालक शिक्षक संघ PTA स्थापन केला असल्यास -1, नसल्यास -2, असे प्रपत्रामध्ये नमूद करावे.
- (फ) स्थापन केला असल्यास मागील शैक्षणिक वर्षात पालक शिक्षक संघाच्या झालेल्या बैठकांची संख्या अंकात नमुद करावी (PTA इतिवृत नोंद वहीनुसार)

## B (I). शाळेतील सर्व शालेय इमारत आणि शैक्षणिक साधने / सुविधा / फर्निचर

**1. शाळा इमारत स्थिती :** शाळा इमारत स्थिती दर्शविण्यासाठी खालील सांकेतांक वापरावे.

*** (शाळेच्या इमारतीतील काही खोल्या भाड्याच्या असतील किंवा काही मालकीच्या असतील तर ज्या खोल्यांचा उपयोग जास्त प्रमाणात होतो त्या खोल्यांच्या बाबत माहिती द्यावी.)**

1. **खाजगी (बिनभाड्याची) :** वैयक्तिक असलेली खाजगी इमारत ज्यासाठी भाडे दिले जात नाही, खाजगी शाळेची बिनभाड्याची इमारत.
2. **खाजगी भाड्याची :** खाजगी भाड्याची इमारत.
3. **शासकीय :** जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगर परिषद, आदिवासी कल्याण, समाज कल्याण, इ. विभागाच्या मालकीची इमारत.
4. **भाडेविरहित शासकीय शाळा :** शासकीय शाळा भाडेविरहित इमारतीत भरत असल्यास. (उदा. मंदीर, चावडी, ग्रामपंचायत, गावकीची इमारत इ.)
5. **इमारत नाही :** शाळेला इमारत नसल्यास.
6. **धोकादायक इमारत:-** पूर्ण इमारत धोकादायक असल्यास धोकादायक नमूद करावे. धोकादायक प्रकारामध्ये कार्यकारी अभियंता/शहर अभियंता (बांधकाम) यांनी सदर इमारत/वर्गखोलीची पाहणी करुन धोकादायक असल्याचे प्रमाणित करावे.
7. **शाळेच्या इमारतीचे बांधकाम चालू असल्यास 7 हा क्रमाक पपत्रात नमुद करावा .**

**2. अ) वर्गखोल्या व फर्निचर बाबतचा तपशील (इमारत नसलेल्या शाळेने भरू नये) :**

- **अध्यापनासाठी उपलब्ध असलेल्या वर्गखोल्यांची संख्या :-**
  शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या एकूण खोल्यापैकी केवळ अध्यापनासाठी उपलब्ध असलेल्या वर्गखोल्यांची संख्या नमूद करावी.
- **बांधकाम सुरु असलेल्या वर्गखोल्यांची संख्या** :- शाळेकरीता अध्यापनासाठी बांधकाम सुरु असलेल्या वर्गखोल्यांची संख्या नमूद करावी.
- **विद्यार्थ्यांसाठी फर्निचर :** शाळेमध्ये विद्यार्थ्यांकरिता (डेस्क/टेबल) बसण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध असल्यास = 1, काहींसाठी =2, नाही = 3 नमुद करावे.

**ब) एकूण इतर खोल्यांचा तपशिल :-** अध्यापना व्यतीरिक्त इतर खोल्यांची (मुख्याध्यापक खोली, शिक्षक खोली, कार्यालय, भांडार खोली, खेळाची खोली, वाचनालय, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह इ.) संख्या नमूद करावी.

**क) अध्यापनासाठी वापरण्यात येणाऱ्या वर्गखोल्यांची संख्या :** यामध्ये मुख्याध्यापक खोली, शिक्षक खोली, कार्यालय,भांडार खोली, खेळाची खोली, वाचनालय, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह इ. खोलींचा समावेश करू नये.

- **<u>प्राथमिक शाळांकरीता :-</u>**

1. **पक्की इमारत :** शाळा इमारत भाजलेल्या विटा अथवा दगडाच्या भिंती असलेली, सिमेंटमध्ये बांधलेली, तसेच सिमेंट काँक्रिटचा वापर करून (RCC SLAB) अथवा लोखंडी गर्डर्स वा लाकडी मजबूत वासे यांचे छप्पर/छत असलेली इमारत पक्की म्हणून नमुद करावी.
2. **अंशत: पक्की इमारत :** इमारतीच्या भिंती पक्क्या विटाच्या / दगडी आणि छप्पर/छत लोखंडी पत्र्यांचे किंवा कौलारु, झावळ्यांचे असल्यास अशी इमारत अंशत: पक्की म्हणून नमुद करावी.
3. **कच्ची इमारत :** कच्च्या विटा, मातीच्या भिंती, कुडाच्या भिंती आणि लोखंडी पत्रे , गवती किंवा तात्पुरती टिकणारी छप्परे असलेली इमारत कच्ची म्हणून नमुद करावी.
4. **तंबूमधील शाळा : राज्यात लागू नाही.**

- **<u>वर्ग खोल्यांची स्थिती</u> :-**
  - अ) **चांगल्या स्थितीत : -** कोणत्याही प्रकारच्या दुरुस्तीची गरज नसलेल्या वर्ग खोल्यांची संख्या नमुद करावी.
  - ब) **किरकोळ दुरुस्तीची गरज असलेल्या :** वर्गखोली दुरुस्ती करीता पाच हजार रुपयांपर्यंतचा खर्च असल्यास अशा वर्गखोल्यांची संख्या नमुद करावी.
  - क) **मोठ्या दुरुस्तीची गरज असलेल्या :** वर्गखोली दुरुस्ती करीता पाच हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च असल्यास अशा वर्गखोल्यांची संख्या नमुद करावी.

**3.** शाळेत अतिरिक्त बांधकामासाठी जागा उपलब्ध असल्यास 1 नमूद करावे, नसल्यास 2 नमूद करावे.

**4. मुख्याध्यापक / मुख्य शिक्षकांसाठी खोली :-** मुख्याध्यापक / मुख्य शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध असल्यास 1 लिहावा, नसल्यास 2 लिहावे.

5. **स्वच्छतागृह व मुतारीबाबतचा तपशिल :-**

- शाळेमध्ये मुला-मुलींसाठी उपलब्ध असलेल्या स्वतंत्र स्वच्छतागृहांची संख्या (Toilet Seat) स्वतंत्रपणे नमूद करावी.
- शाळेमध्ये मुला-मुलींसाठी उपलब्ध असलेल्या स्वतंत्र स्वच्छतागृहां पैकी वापरात असलेली स्वच्छतागृहांची संख्या स्वतंत्रपणे नमुद करावी. (सुस्थितीमधील भांडे, नियमित स्वच्छता, कमी वास, वापरण्यास योग्य, बंद दरवाजा, कार्यरत ड्रेनेज व्यवस्था)
- शाळेमध्ये मुला-मुलींसाठी उपलब्ध असलेल्या स्वच्छतागृहांमध्ये फ्लशींग व स्वच्छता यासाठी पाण्याची सुविधा उपलबध असलेल्या स्वच्छतागृहांची संख्या स्वतंत्रपणे नमूद करावी.
- शाळेमध्ये मुला-मर्लींसाठी उपलब्ध असलेल्या मुतारींची संख्या स्वतंत्रपणे नमूद करावी.

5. **(अ)** शाळेमधील स्वच्छतागृह / मुतारी जवळ हात धुण्यासाठी पाण्याची व्यवस्था असल्यास प्रपत्रामध्ये 1 नमूद करावे. अशी सुविधा उपलब्ध नसल्यास 2 नमूद करावे.

**(ब)** शाळेमध्ये अपंगासाठी विशेष गरजा असलेले (CWSN) कमोड स्वच्छतागृह उपलब्ध असल्यास 1 नमुद करावे. सदर सुविधा उपलब्ध नसल्यास 2 नमुद करावे.

6. **शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था :** शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या एकापेक्षा जास्त सुविधा उपलब्ध असल्यास त्यापैकी जास्त प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या फक्त एकाच सुविधेचा क्र. लिहावा. हातपंप -1, विहीर - 2, नळ - 3, इतर - 4, कोणतेही नाही-5.

**(अ)** शाळेमध्ये उपलब्ध असलेली पिण्याच्या पाण्याची सुविधा वापरात असल्यास प्रपत्रात 1 नमूद करावे. सदर सुविधा वापरात नसल्यास प्रपत्रामध्ये 2 नमूद करावे.

